वि. दि. दा. क्र. २५/२०१८
लक्ष्मीबाई व इतर - वि.- शासन व इतर

**<u>निशाणी क्र.१०१ वरील आदेश</u>**

१. गैरअर्जदार यांनी सदरचा अर्ज दिनांक २०/०२/२०२१ रोजी नि.क्र. ४१ वरील उलटतपास नाहीचा आदेश हा रद्द करुन गैरअर्जदारास उलटतपास घेण्यास परवानगी मिळणेसाठी दिलेला आहे.

२. गैरअर्जदाराचे कथन की, दिनांक २०.०२.२०२१ रोजी फौजदारी प्रकरणांमध्ये व्यस्त असल्याने वेळेत उलटतपास घेउ शकले नाही.त्यामुळे उलटतपास नाहीचा आदेश पारीत केलेला असुन तो रदद करणे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने गरजचे आहे.

३. अर्जदारातर्फे सदरच्या अर्जाला आक्षेप घेण्यात आला.

४. अर्ज आणि त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले.

५. युक्तीवाद श्रवण.

६. गैरअर्जदाराविरुध्द ते गैरहजर असल्यामुळे उलटतपास नाहीचा आदेश पारीत झाला. आज रोजी गैरअर्जदार उलटतपास घेण्यास तयार असल्याचे सांगितले. नैसर्गिक न्यायाच्या हेतुने दिनांक २०.०२.२०२१ रोजीचा उलटतपास नाहीचा आदेश रदद करण्यात येतो. पर्यायाने आदेश खालीलप्रमाणे

**<u>आदेश</u>**

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.
२. गैरअर्जदाराविरुध्द दिनांक २०.०२.२०२१ रोजी पारीत केलेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

DILIP SHANKARRAO THORAT
Digitally signed by DILIP SHANKARRAO THORAT
Date: 2025.01.04 15:36:53 +0530

दिनांक ०४.०१.२०२४

(डि.एस. थोरात)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
जालना.